| MHSN060018132021 | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | १८/०९/२०२१ | | |
| | नोंद दिनांक | २१/०९/२०२१ | | |
| | न्यायनिर्णय दिनांक | ०२/०६/२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०४ | ०८ | १५ |

# फॉर्म नं.XXXII
## भाग–अ
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(i) अन्वये)

| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र.३), मिरज यांचे न्यायालय<br>(पिठासीन अधिकारी पूनम दिपक गायकवाड)<br>(दिनांक ०२/०६/२०२६)<br>(नियमित फौजदारी खटला क्र.६५२/२०२१) नि.क्र.५६ | |
|---|---|
| महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे, गुन्हा क्र.२०/२०२१ | |
| अपराधः भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३९२ सह कलम ३४ अन्वये | |
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे, मिरज,<br>ता. मिरज, जि. सांगली. |
| **विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता** | **श्रीमती व्ही. के. मदने** |
| **आरोपी** | **राजा पिरा शेख,**<br>व.व.३२, व्यवसाय–मजुरी,<br>रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली. |
| **आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ** | **श्री. एम. ए. शेख** |

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १८/०१/२०२१ |
| फिर्याद दाखल दिनांक | १९/०१/२०२१ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | १८/०९/२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०७/०३/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०३/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | ०२/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वाये समायोजीत करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजा पिरा शेख | २०/०१/२०२१ | २२/०१/२०२१ | भा.दं.वि., १८६० कलम ३९२ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | विवेकानंद सिताराम होवाळे | फिर्यादी | २४ |

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| २. | मैनुद्दीन युसूफ मुजावर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ३२ |
| ३. | सागर सुरेश वाघेला | घटनास्थळ पंच | ४१ |
| ४. | श्री. आर. डी. पवार | तपासी अंमलदार | ४४ |

**ब. आरोपी** (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालय** (साक्षीदार तपासणेत आला असल्यास)

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | २५ | फिर्याद |
| २. | २६ | प्रथम खबर अहवाल |
| ३. | ४२ | सा.क्र.३ यांची घटनास्थळ पंचनामेवरील सही |
| ४. | ४५ | तपासाबाबतचा लेखी आदेश |
| ५. | ४६ | घटनास्थळ पंचनामा |
| ६. | ४७ | सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळणेबाबतचे पत्र |

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| ७. | ४८ | जप्ती/घरझडती पंचनामा |
| ८. | ४९ | मुद्देमाल पावती |
| ९. | ५० | ओळखपरेड होऊन मिळणेबाबतचे पत्र |
| १०. | ५१ | ओळखपरेड होऊन मिळणेबाबतचे स्मरणपत्र |
| ११. | ५२ | तहसिलदार, मिरज यांचे पत्र |
| १२. | ५३ | तहसिलदार, मिरज यांना दिलेले पत्र |
| १३. | ५४ | सा.क्र.२ यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग–अ |

**ब. बचावपक्ष** (खालील कागदपत्रे बचाव पक्षातर्फे मान्य करण्यात आली आहेत.)

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाने निशाणी दिलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक. |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | आर्टीकल क्रमांक | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | -- | १०.५४० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन |

---------------------------------------------------------------------------------------------

# न्या य नि र्ण य

(घोषीत आज दिनांक ०२ माहे जून, २०२६ रोजी)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३९२ सह कलम ३४ अंतर्गत खटला चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाचा खटला थोडक्यात असा की, फिर्यादी विवेकानंद सिताराम होवाळे हे मुंबई येथे एका कपंनीमध्ये नोकरीस आहेत. त्यांचे मुळ गांव मिरज असून मिरजमध्ये असलेले त्यांचे घर त्यांनी भाड्याने दिलेले आहे. ते अधून–मधून मिरज येथे येत असत. दिनांक १८/०१/२०२१ रोजी ते व त्यांची आई इंदुबाई मिरज येथे आले व अमर खड्यासमोरील संकेत रेसीडेन्सी या हॉटेलमध्ये राहिले. त्यांची आई दुपारी २.३० वा. त्यांच्या घराकडे गेल्या व फिर्यादी हॉटेलवर थांबले. त्यानंतर रात्री १०.१५ वा. चे सुमारास ते त्यांच्या आईला आणणेकरीता हॉटेलमधून निघून मिरज एस.टी. स्टॅण्ड समोरील डांबरी रोडने पायी चालत जात असताना त्यांच्या पाठीमागून काळ्या रंगाचा टी शर्ट घातलेला इसम आला व त्यांना धक्का देऊन खाली पाडून जबरदस्तीने त्यांच्या गळ्यातील चेन हिसडा मारुन तोडली व पाठीमागून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या मोपेड गाडीवर पाठीमागे बसून ते दोघे एस.टी. स्टॅण्डमधून बाहेर येण्याच्या मार्गाने पळून गेले. त्यांनी त्यांचा पाठलाग केला परंतू ते मिळून आले नाहीत. त्यामुळे फिर्यादी यांनी पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली.

०३. सदर फिर्याद वरुन पोलीसांनी गुन्हा क्र.२०/२०२१ नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. आर. डी. पवार यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व घटनास्थळ पंचनामा केला. आरोपीस अटक करुन जप्ती पंचनामा केला. इतर कागदपत्रे हस्तगत केली. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा हाती आल्याने त्याच्याविरुध्द सदरचे दोषारोपपत्र दाखल केले.

०४. दोषारोपपत्र व त्यासोबत दाखल कागदपत्रांआधारे माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र.१५ वर दोषारोप ठेवला, तो आरोपीस वाचून व समजावून सांगितला असता, त्याने गुन्हा नाकबूल केला व संपरिक्षणाची तयारी दर्शवली. आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे चार साक्षीदारांना तपासणेत आले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३(१)(ब) प्रमाणेचे निवेदन नि.क्र.५५ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीने स्वतःच्या बचावासाठी कोणताही लेखी/तोंडी पुरावा दिला नाही. शेवटी सहा. सरकारी अभियोक्ता व बचाव पक्षाचे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

०५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुराव्यावरुन खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले. त्यावर मी माझ्या कारणमिंमासेसह खालील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १८/०१/२०२१ रोजी २२.१५ वा. चे दरम्यान मिरज एस.टी. स्टॅण्ड, मिरज येथे सार्वजनीक रस्त्यावर आरोपीने एका अज्ञात व फरार आरोपीशी संगनमत करुन फिर्यादी यांना धक्का देऊन त्यांना खाली पाडून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन बळजबरीने हिसडा मारुन हिसकवून घेतली व दुचाकी वरुन पळून गेला त्यानुसार त्याने भारतीय दंड विधान कलम, ३७९ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र णे मि मां सा

***मुद्दा क्र.१ करिताः–***

०६. प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३९२ सह कलम ३४ अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे. भारतीय दंड विधानाचे कलम ३९० हे जबरी चोरी (Robbery) या अपराधाची व्याख्या करते. सदर कलमानुसार चोरी करताना, चोरी करण्याच्या उद्देशाने किंवा चोरी केलेली मालमत्ता घेऊन जाताना आरोपीने एखाद्या व्यक्तीस स्वेच्छेने मृत्यू, दुखापत किंवा अवैध प्रतिबंध घडवून आणला अथवा त्याची तत्काळ भीती निर्माण केली, तर अशी चोरी जबरी चोरी ठरते. कलम ३९२ हे अशा जबरी चोरीबद्दल शिक्षेची तरतूद करते.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याची चेन बळजबरीने हिसकावून घेण्याच्या उद्देशाने त्यांना धक्का देण्यात आला, त्यांना खाली पाडण्यात आले, त्या कृतीद्वारे त्यांच्यावर बलप्रयोग करण्यात आला आणि सदर कृती यातील आरोपीनेच एका अज्ञात सहआरोपीशी समान हेतूने केली. तसेच आरोपीच गुन्हेगार होता, ही बाबही संशयापलीकडे सिद्ध होणे आवश्यक आहे. अशा सर्व आवश्यक बाबी विश्वासार्ह व सुसंगत पुराव्याद्वारे सिद्ध झाल्यासच आरोपीस कलम ३९२ सह कलम ३४ अन्वये दोषी धरता येईल.

**०७.** फिर्यादी साक्षीदार क्र.१ विवेकानंद यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १८/०१/२०२१ रोजी ते व त्यांची भाडे स्विकारण्यासाठी मिरज येथे आले होते. त्यांची आई दुपारी २.३० वा. भाडे आणणेसाठी त्यांच्या रुमवर गेली होती, रात्री १०.१५ वा. ते त्यांच्या आईला आणणेकरिता एस. टी. स्टॅण्ड समोरील रोडवरुन पायी चालत जात असताना त्यांच्या पाठीमागून एक काळ्या रंगाचा टी शर्ट घातलेला व्यक्ती आला व त्याने त्यांच्या गळ्यातील चेन हिसकावली. त्यांनी पकडण्याच प्रयत्न केला असता, त्याने त्यांना धक्का देऊन खाली पाडले. त्यानंतर तो पाठीमागून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या मोपेड गाडीवर पाठीमागे बसून एस.टी.

स्टॅण्डच्या बाहेर पळून गेला. त्यांची चेन १५ ग्रॅम वजनाची, व्ही अक्षर असलेले ६ ग्रॅम वजनाचे पेंडंन असलेली ७० हजार रुपये किंमतीची होती. घटनेनंतर ते घाबरले होते. त्यांनी १०० नंबरला फोन केल्यानंतर तेथे पोलीस व्हॅन आली. त्यांनी दुसऱ्या दिवशी पोलीस ठाण्यात फिर्याद (नि.क्र.२५) दिली. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, तक्रार दिल्यानंतर ते पोलीस ठाण्यात गेले. त्यांना काही दिवसांनी पोलीसांचा फोन आला व चेन चोरलेला इसम सापडला असून त्याचे नांव राजा पिरा शेख असल्याचे सांगीतले. त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन जप्त चेन पाहून ती त्यांचीच असल्याची खात्री केली. त्यांची चेन अर्धी तुटलेली होती. अर्धी चेन व पेंडन त्यांना मिळाले नाही. त्यांनी पोलीसांना घटनास्थळ दाखवल्यावरुन पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा केला व नकाशा काढला.

०८. आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञांनी फिर्यादी यांचा सखोल असा उलटतपास घेतला. उलटतपासामध्ये त्यांनी हे मान्य केले की, नि.क्र.२५ व २६ मध्ये त्यांनी १०० नंबर वर फोन केल्याची बाब नमूद नाही. त्यांनी असे कथन केले की, त्यांनी पोलीसांना फोन केला त्यावेळी पोलीसांची गाडी तेथे आल्यानंतर त्यांनी घटनेची सर्व माहिती पोलीसांना सांगीतली होती, त्यांनी सांगीतलेली घटना पोलीसांनी डायरीमध्ये लिहून घेतली नव्हती. पुढे त्यांनी असे मान्य केले की, घटनास्थळ चौक असून रहदारीचे व लोकवस्तीचे ठिकाण आहे तसेच पोलीसांनी मुद्देमाल

ओळखीसाठी बोलावले तेव्हा त्यांच्यासमोर त्यांच्या चेनसारख्या दिसणाऱ्या आठ ते दहा चेन ठेऊन त्यातील त्यांची चेन ओळखण्यास सांगीतले नाही. पुढे त्यांनी असेही मान्य केले की, त्यांना पोलीसांनी आरोपीला पोलीस ठाण्यात दाखवले नव्हते.

**०९.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार साक्षीदार क्र.२ मैनुद्दीन हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्यांनी अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर समर्थन केले नाही. त्यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी कोणती घटना घडली होती, हे त्यांना आठवत नसल्याचे स्पष्ट कथन केले. त्यामुळे अभियोग पक्षाने त्यांना उलटतपासाच्या स्वरुपात सुचक प्रश्ने विचारली. परंतू त्यामध्ये त्यांनी आरोपीला पळून जाताना पाहिल्याचे व त्याचा पाठलाग केल्याचे साफ नाकारले आहे. याउपर त्यांनी त्यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग–अ देखील स्पष्टपणे अमान्य केला आहे.

**१०.** तसेच अभियोग पक्षाच्या कथनानुसार साक्षीदार क्र.३ सागर हे घटनास्थळ पंचनामेवरील पंच साक्षीदार आहेत. परंतू, त्यांनीदेखील अभियोग पक्षास समर्थन केले नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांची सही (नि.क्र.४२) मान्य करुन, पंचनाम्यातील सर्व मजकूर नाकारला आहे. त्यामुळे त्यांना देखील अभियोग पक्षातर्फे उलटतपासाच्या स्वरुपात सूचक प्रश्न विचारले. परंतू, त्यामध्ये त्यांनी दिनांक १९/०१/२०२१ रोजी पोलीसांनी त्यांच्यासमक्ष

घटनास्थळ पंचनामा केल्याचे तसेच दिनांक २०/०१/२०२१ रोजी आरोपीच्या राहत्या घरी त्यांच्यासमक्ष अंगझडती घेऊन त्याच्या ताब्यातून १० ते ११ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन जप्त करुन तसा पंचनामा केल्याची बाब साफ नाकारली आहे.

**११.** साक्षीदार क्र.४ श्री. आर. डी. पवार यांनी प्रस्तूत गुन्हयाचा तपास केला आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, गुन्हा क्र.२०/२०२१ चा तपास त्यांच्याकडे लेखी आदेश (नि.क्र.४५) नुसार आल्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.४६) केला. त्यानंतर त्यांनी आगार व्यवस्थापक, मिरज एस. टी. स्टॅण्ड, मिरज यांना सी.सी.टी.व्ही. फुटेज मिळण्यासाठी पत्र (नि.क्र.४७) दिले. त्यानंतर साक्षीदारांचे त्यांच्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदवले. दिनांक २०/०१/२०२१ रोजी बातमी मिळाल्यावरुन आरोपीस अटक केली. आरोपीने चोरीचा मुद्देमाल त्याच्या राहत्या घरी बॅगमध्ये लपवून ठेवल्याचे कबूल केले. त्यानंतर दोन पंचांसमक्ष आरोपीच्या राहत्या घरी जाऊन जप्ती/घरझडती पंचनामा (नि.क्र.४८) करुन मुद्देमाल ताब्यात घेतला. मुद्देमाल पावती (नि.क्र.४९) तयार केली. त्यानंतर ओळखपरेड होऊन मिळणेसाठी पत्र (नि.क्र.५०) दिले. त्यानंतर दिनांक २७/०१/२०२१ रोजी तहसिलदार यांना ओळखपरेड होणेकामी स्मरणपत्र (नि.क्र.५१) पाठवले. त्यानंतर दिनांक २५/०३/२०२१ रोजी तहसिलदार यांनी आरोपीला ओळखणारे साक्षीदार यांचे नाव व पुर्ण पत्त मिळणेसाठी त्यांना पत्र

(नि.क्र.५२) दिले. सदर माहिती कळविणेसाठी तहसिलदार यांना पत्र (नि.क्र.५३) दिले. साक्षीदार मैनुद्दीन यांचा जबाबातील अधोरेखांकीत भाग–अ (नि.क्र.५४) त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. उलटतपासामध्ये त्यांनी हे मान्य केले की, घटनास्थळाजवळचा रस्ता हा पंढरपूर–सोलापूर रस्ता असून तो रहदारीचा आहे तसेच त्याच्या डाव्या बाजुला दुकाने, हॉस्पीटल व घरे आहेत. पुढे त्यांनी असे कथन केले की, त्यांनी लॉकअप रजिष्टरच्या नोंदी तसेच वाहनांच्या लॉगबूकच्या नोंदी दोषारोपपत्रसोबत दाखल केल्या नाहीत. तसेच त्यांनी हे मान्य केले की, नि.क्र.४८ वरील जप्ती/घरझडती पंचनाम्याची प्रत आरोपीला दिली नाही. उर्वरीत सूचक प्रश्न त्यांनी नाकारले आहेत.

१२. एकंदरीत अभिलेखावरील तोंडी व दस्तऐवजी पुराव्याचे साकल्याने अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्र.१ विवेकानंद यांच्या पुराव्यामधून फिर्याद (नि.क्र.२५) व घटना घडल्याची बाब काही प्रमाणात सिद्ध केली आहे. फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसडा मारून नेल्याचे कथन केले आहे. तथापि, केवळ घटना घडल्याचे सिद्ध होणे हे आरोपीस दोषी धरण्यास पुरेसे ठरत नाही. फौजदारी न्यायशास्त्रानुसार सदर गुन्हा करणारी व्यक्ती यातील आरोपीच होता,

ही बाब देखील संशयापलीकडे सिद्ध होणे आवश्यक असते. प्रस्तूत प्रकरणात फिर्यादी यांनी आरोपीला घटनेच्या वेळी स्पष्टपणे पाहिल्याचे अथवा त्याची ओळख लक्षात राहिल्याचे कोणतेही कथन केलेले नाही. उलटपक्षी, त्यांनी सुरुवातीपासूनच अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे आरोपीचा सहभाग सिद्ध करण्यासाठी ओळखपरेड अथवा तत्सम स्वतंत्र पुरावा अत्यंत महत्त्वाचा ठरत होता.

१३. येथे नमूद करावे वाटते की, फिर्यादी यांनी सरतपासामध्ये आरोपीचे नाव त्यांना नंतर पोलीसांकडून समजल्याचे कथन केले आहे. परंतु आरोपीची ओळख निश्चित करण्यासाठी कोणतीही कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य अशी ओळखपरेड प्रत्यक्ष पार पडल्याचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. उलट फिर्यादी यांनी उलटतपासामध्ये त्यांच्यासमोर त्यांच्या चेनसारख्या दिसणाऱ्या अनेक चेन ठेवून त्यांना ओळखण्यास सांगितले नसल्याचे तसेच पोलीसांनी आरोपीला त्यांना दाखवले नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे आरोपीची ओळख हा अभियोग पक्षाच्या खटल्यातील अत्यंत महत्त्वाचा दुवा अपूर्ण राहतो. याशिवाय कथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.२ मैनुद्दीन यांनीदेखील अभियोग पक्षास कोणत्याही महत्त्वाच्या मुद्द्यावर समर्थन दिलेले नाही. त्यांनी आरोपीला घटनास्थळावर अथवा घटनानंतर पाहिल्याचे नाकारले आहे. परिणामी, फिर्यादी यांच्या एकट्या पुराव्यावरून आरोपीच सदर गुन्ह्याचा कर्ता होता, असा निर्विवाद निष्कर्ष काढणे सुरक्षित ठरत नाही.

१४. यापुढे असेही दिसून येते की, अभियोग पक्षाने आरोपीचा गुन्ह्याशी संबंध जोडण्यासाठी कथित जप्तीवर मुख्य भर दिलेला आहे. कायद्याने स्थापित तत्त्वानुसार जेव्हा प्रत्यक्ष ओळखीचा पुरावा कमकुवत अथवा अनुपलब्ध असतो, तेव्हा आरोपीच्या ताब्यातून मिळून आलेला मुद्देमाल हा एक महत्त्वाचा परिस्थितीजन्य पुरावा ठरू शकतो. मात्र अशा परिस्थितीत जप्तीची प्रक्रिया संशयातीत व विश्वासार्हरीत्या सिद्ध होणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात तपासी अंमलदार साक्षीदार क्र.४ यांनी आरोपीच्या सांगण्यावरून त्याच्या राहत्या घरातून सोन्याची चेन जप्त केल्याचे कथन केले आहे. परंतु सदर जप्ती पंचनाम्यास स्वतंत्र पंच साक्षीदार क्र.३ सागर यांनी कोणताही दुजोरा दिलेला नाही. उलट त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य करूनही पंचनाम्यातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. त्यांनी आरोपीच्या घरातून कोणतीही सोन्याची चेन जप्त केल्याचे स्पष्टपणे अमान्य केले आहे.

१५. फौजदारी खटल्यामध्ये जप्ती पंचनाम्यास स्वतंत्र पंच साक्षीदाराचा पाठिंबा नसल्यास अशा जप्तीकडे अत्यंत सावधगिरीने पाहणे आवश्यक असते. विशेषतः जेव्हा संपूर्ण जप्तीचा आधार केवळ तपासी अंमलदाराच्या साक्षीवर अवलंबून असतो आणि स्वतंत्र पंच त्यास समर्थन देत नाही, तेव्हा अशा पुराव्याची विश्वासार्हता लक्षणीयरीत्या कमी होते. याउपर तपासी अंमलदार यांनी उलटतपासामध्ये जप्ती

पंचनाम्याची प्रत आरोपीस दिली नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे कथित जप्तीची प्रक्रिया पूर्णपणे संशयमुक्त असल्याचे म्हणता येत नाही. परिणामी, आरोपीने चोरी केलेली सोन्याची चेन त्याच्या ताब्यातून मिळून आली, ही बाबदेखील अभियोग पक्षास समाधानकारकपणे सिद्ध करता आलेली नाही.

१६. फौजदारी न्यायशास्त्रातील मूलभूत तत्त्व असे आहे की, आरोपीवरील आरोप संशयापलीकडे जाऊन सिद्ध करण्याची जबाबदारी संपूर्णपणे अभियोग पक्षावर असते आणि त्या जबाबदारीत कोणतीही त्रुटी राहिल्यास त्याचा लाभ आरोपीस मिळणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात अभिलेखावरील संपूर्ण पुराव्याचा एकत्रित विचार केला असता, (i) आरोपीची ओळख संशयापलीकडे सिद्ध झालेली नाही, (ii) कथित प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन दिलेले नाही, (iii) स्वतंत्र पंच साक्षीदाराने जप्तीची बाब नाकारली आहे, (iv) आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल मिळून आल्याची बाब विश्वासार्हरीत्या सिद्ध झालेली नाही आणि (v) आरोपी व कथित फरार सहआरोपी यांच्यातील समान हेतू अथवा संगनमत याबाबत कोणताही स्वतंत्र पुरावा उपलब्ध नाही.

१७. याउपर, फिर्यादी व तपासी अंमलदार या दोघांनीही घटनास्थळ हे रहदारीचे व लोकवस्तीचे ठिकाण असल्याचे मान्य केले आहे. अशा परिस्थितीत

स्वतंत्र साक्षीदार उपलब्ध होण्याची शक्यता असतानाही अभियोग पक्षाने आरोपीचा सहभाग सिद्ध करणारा कोणताही निःपक्षपाती व स्वतंत्र पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे केवळ संशय, शक्यता अथवा अनुमान यांच्या आधारे आरोपीस दोषी ठरविणे न्यायोचित होणार नाही. एकंदरीत उपलब्ध पुरावा आरोपीचा सहभाग संशयापलीकडे सिद्ध करण्यास अपुरा पडत असल्यामुळे दिनांक १८/०१/२०२१ रोजी आरोपीने एका अज्ञात व फरार आरोपीशी संगनमत करून फिर्यादी यांच्या गळ्यातील सोन्याची चेन बळजबरीने हिसडा मारून हिसकावून घेतली व त्याद्वारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३९२ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, ही बाब सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपीस दोषी धरणे सुरक्षित अथवा न्यायोचित ठरणार नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

***<u>मुद्दा क्र.२ करिताः–</u>***

**१८.** मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपीस भारतीय दंड विधान, कलम ३९२ सह कलम ३४ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोषमुक्त करणे न्यायोचीत ठरते. प्रस्तूत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक १०.५४० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन ही फिर्यादीस मिळाल्याबाबत त्यांनी पुराव्यात कथन केले आहे. त्यामुळे अपिल कालावधीनंतर मुद्देमालाचा कायमस्वरुपी ताबा फिर्यादीला देणे न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्र.२ करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## आ दे श

१. आरोपी राजा पिरा शेख याची भारतीय दंड विधान, कलम ३९२ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एक १०.५४० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन याचा फिर्यादीस मिळालेला ताबा अपिल कालावधीनंतर कायम करणेत येतो.

३. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७-अ अन्वये रक्कम रु.१५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र नव्याने द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन घोषीत करण्यात आला.)

POONAM DIPAK GAIKWAD

Digitally signed by POONAM DIPAK GAIKWAD
Date: 2026.06.02 16:46:36 +0530

ठिकाण : मिरज.

**(श्रीमती पी. डी. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मिरज
(न्यायालय क्र.३)

दिनांक ०२/०६/२०२६.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. U.P.Patil | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 02 | 06 | 2026 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 02 | 06 | 2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 02 | 06 | 2026 |